बागवानी मिशन
Horticulture Mission

राष्ट्रीय बागवानी मिशन
NATIONAL HORTICULTURE MISSION

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

## वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण अंमलबजावणी सुचना

**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे.**

Maharashtra State Horticulture

# वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी अंमलबजावणी सुचना

**प्रस्तावनाः**

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामुहीक शेततळे ही योजना राबविण्यात येत असून पाण्याचा साठा निर्माण करणे (Creation of Water Resources) व साठविलेले पाणी झिरपून वाया जाऊ नये तसेच पाणी टंचाईच्या काळात फळबागा जगविण्यासाठी साठविलेल्या पाण्याचा उपयोग व्हावा म्हणून शेततळ्यास योग्य दर्जाच्या प्लास्टीक फिल्मचे अस्तरीकरण करणेबाबत केंद्र शासनाच्या सुचना आहेत.

या अनुषंगाने, MGNREGS, RKVY, मागेल त्याला शेततळे, भरडधान्य अभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कोरडवाहू शेती अभियान, गळीतधान्य अभियान तसेच स्वखर्चाने खोदकाम केलेले शेततळे, या सारख्या व इतर योजनाअंतर्गत खोदकाम पूर्ण झालेल्या शेततळयांच्या प्लास्टिक फिल्म अस्तरीकरणासाठी एकूण अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रू. ७५०००/- या मर्यादेत अनुदान देय आहे.

**उद्देश :-**

१. फलोत्पादन पिकांसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे.
२. दुष्काळी भागामध्ये फलोत्पादन पिकाच्या क्षेत्रविस्तारासाठी सिंचन सुविधा निर्माण करणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

१. लाभार्थी हे शेतकरी असावेत.
२. शेतकरी समुहाकडे फलोत्पादन पिके असणे आवश्यक राहील.

**अंमलबजावणी कार्यपध्दती :-**

**अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदा-या :**

**१. लाभ घेऊ इच्छिणारे शेतकरी :-**

१.१ लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतक-यांनी हॉर्टनेट http://www.hortnet.gov.in या ऑनलाईन संकेतस्थळावर नोंदणी करावी. नोंदणी करतानाच शेतक-यांनी ७/१२, ८-अ चा नमुना, आधार कार्ड, आधार संलग्न राष्ट्रीयकत बँक खाते पास बुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, विहीत नमुन्यातील हमीपत्र, संवर्ग प्रमाणपत्र (अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती शेतक-यासाठी), हॉर्टनेटच्या संकेत स्थळावर अपलोड करावेत. थेट पध्दतीने अर्ज (ऑफलाईन) कोणत्याही कार्यालयात स्विकारले जाणार नाहीत.

१.२ पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

प्रस्तावामध्ये लाभार्थीने खालील कागदपत्रे जोडावीत.

१. विहीत नमुन्यातील अर्ज.
२. ७/१२ चा उतारा (फलोत्पादनाच्या नोंदीसह).
३. आधार कार्डची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डची मागणी केलेल्या पावतीची झेरॉक्स).
४. आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स (फोटोसह).
५. हमीपत्र.

Maharashtra State Horticu

६. लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास प्राधिकृत अधिका-याचे प्रमाणपत्र/संवर्ग दाखला.

वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह तालुका कृषि अधिकारी यांना प्रस्ताव १० कार्यालयीन दिवसात सादर करावयाचा आहे. अपूर्ण व त्रुटीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

१.३ पुर्वसंमती मिळालेपासून १५ दिवसाच्या आत काम सुरु करणे आवश्यक राहील. अन्यथा पुर्वसंमती रद्द करण्यात येईल.

१.४ पुर्वसंमती दिलेल्या तारखेपासून **२** महिन्यात काम पुर्ण करणे आवश्यक राहील.

१.५ शेततळे खोदाई अस्तरीकरण आणि कुंपन करणे इ. कामे झाल्यानंतर संबंधीत कृषि सहाय्यकास किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक राहील.

१.६ शेततळ्यासाठी **BIS Standard** ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS 15351:2015 Type II या दर्जाची वापरणे आवश्यक राहील.

१.७ शेतक-यांना त्यांच्या पसंतीनुसार विहीत दर्जाच्या अस्तरीकरणासाठी वापरावयाच्या फिल्मचे उत्पादक निवडण्याचा अधिकार राहील.

१.८ पूर्वसंमती पत्रासोबत दिलेल्या आराखडयाप्रमाणे व तांत्रिक मापदंडाप्रमाणे कामे करणे आवश्यक राहील.

**२ तालुका कृषि अधिकारी :-**

२.१ सोडत पध्दतीद्वारे तयार केलेल्या जेष्ठता सुचितील क्रमानुसार तालुक्याच्या मंजूर आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहून तालुका कृषि अधिकारी यांनी पुर्वसंमती द्यावी. पुर्वसंमती देण्यापुर्वी मुद्दा क्र. **१.३** मध्ये नमुद केल्याप्रमाणे शेतक-यांकडून कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावी.

२.२ शेतक-यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच शेततळेचे तांत्रिक निकष व आराखडा समजून सांगावा.

२.३ शेतक-यांना अधिकृत फिल्म पुरवठादारांची यादी उपलब्ध करुन द्यावी.

२.४ शेतक-यांनी प्लॅस्टीक फिल्म बसविल्यानंतर तसेच तारेचे कुंपण केल्यावर मंडळ कृषि अधिकारी यांनी कांमाची मापे घेऊन मापनपुस्तिकेमध्ये नोंदवावीत आणि **मोका तपासणी** करावी.

२.५ तालुका कृषि अधिकारी यांनी कामाची किमान **१०** टक्के तपासणी करावी.

**३ उपविभागीय कृषि अधिकारी :-**

३.१ उपविभागीय कृषि अधिकारी यांनी कामाची ५ टक्के तपासणी करावी व अनुदानाचा प्रस्ताव शिफारशीसह जिअकृअ यांच्याकडे अनुदानासाठी सादर करावा.

३.२ शेततळ्याचे भौगोलिक स्थानांकन (**Geo tagging**), करावे. शेतकरी /शेतकरी प्रतिनिधी समवेत शेततळ्याचे अक्षांश/रेखांश सह फोटो काढावेत.

**४ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-**

४.१ आयुक्तालय स्तरावरुन दिलेल्या लक्षांकाच्या अधिन राहून तालुका कृषि अधिकारी यांना लक्षांक वाटप करावे.

४.२ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सोडतीची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होण्याकरीता सनियंत्रण करावे व त्यांनी त्यांच्या उपविभागातील किमान एका सोडतीस स्वतः उपस्थित रहावे. उर्वरीत सोडतीस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील वर्ग एकचे अधिकारी उपस्थित राहतील.

४.३ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विहीत दर्जाच्या अस्तरीकरणासाठी वापरावयाच्या फिल्मचे उत्पादक यांची यादी कार्यालयात ठेवावी. शेतक-यांना त्यांच्या पसंतीनुसार फिल्म उत्पादक निवडण्याचा अधिकार राहील.

४.४ उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून अनुदान प्रस्ताव तपासणी अहवालासह प्राप्त झाल्यानंतर जिअकृअ कार्यालयातील तंत्र अधिकारी यांनी प्रपत्र क्र.४ मध्ये नमूद केलेल्या प्रपत्रानुसार शेतक-याचा प्रस्ताव तपासून अनुदान वितरणाकरिता जिअकृअ यांच्या स्वाक्षरीस्तव सादर करावा.

**४.५ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कामाची किमान २ टक्के तपासणी करावी.**

Maharashtra State Hort...

४.६ **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी कमीत कमी १२ कामांची तपासणी करावी. सदरची कामे ही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तपासलेल्या १२ कामांव्यतिरीक्त असावीत.**

४.७ **अनुदान वितरण :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/जिल्हा अभियान समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावांना देय अनुदान PFMS प्रणालीद्वारे जिल्हास्तरावरुन घटकनिहाय, प्रवर्गनिहाय आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत वितरीत करावे.**

४.८ केंद्र/राज्य/महालेखापाल यांच्या लेखा परिक्षण अहवालातील लेखा आक्षेपांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल. यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर योजनेचे सर्व अभिलेखे जतन करुन ठेवावेत.

**५ अधिक्षक कृषि अधिकारी (विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय) (पथक)**

५.१ योजनेतील गुणवत्ता राखण्यासाठी विभागस्तरावर पथकांची स्थापना करुन त्यांच्यामार्फत क्षेत्रियस्तरावर प्रत्येक उपविभागामधील ३ शेततळ्याची आंतरविभागीय रॅण्डम पध्दतीने निवड करुन तपासणी करावयाची आहे. याचे संपूर्ण सनियंत्रण विभागस्तरावरुन करण्यात यावे. यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबावी.

५.२ **तपासणी पथक-** प्रत्येक विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर **सहामाही आंतरविभागीय तपासणी** करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष पथकांची स्थापना करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी पथकातील सदस्य | तपशिल | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | पथक प्रमुख | - |
| २ | कृषि उपसंचालक | सदस्य | १ |
| ३ | तंत्र अधिकारी | सदस्य | १ |
| ४ | कृषि अधिकारी | सदस्य | १ |

५.३ राज्यातील एका विभागाने दुस-या विभागातील जिल्हयांतर्गत तयार झालेल्या शेततळ्यांची आंतरविभागीय तपासणी करण्यासाठी खालीप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित विभागाने त्याच्यासमोर दर्शविलेल्या विभागाची तपासणी करावयाची आहे.

| अ.क्र. | ज्यांनी तपासणी करावयाची तो विभाग | ज्या विभागाची तपासणी करावयाची तो विभाग |
|---|---|---|
| १ | कोल्हापूर विभाग | लातूर विभाग |
| २ | ठाणे विभाग | औरंगाबाद विभाग |
| ३ | नाशिक विभाग | नागपूर विभाग |
| ४ | लातूर विभाग | नाशिक विभाग |
| ५ | पुणे विभाग | ठाणे विभाग |
| ६ | नागपूर विभाग | अमरावती विभाग |
| ७ | औरंगाबाद विभाग | पुणे विभाग |
| ८ | अमरावती विभाग | कोल्हापूर विभाग |

५.४ ज्या विभागाची तपासणी करावयाची आहे. त्या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालकाने तपासणी पथकास सर्व अभिलेख उपलब्ध करुन द्यावेत. तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सक्त सूचना द्याव्यात.

५.५ तपासणी करणा-या विभागाच्या अधिक्षक कषि अधिकारी यांनी तपासणी करावयाच्या विभागातील विभागीय कृषि सहसंचालक यांचेशी संपर्क साधून त्यांच्या अधिनस्त असलेल्या प्रत्येक जिल्हयात या आर्थिक वर्षामध्ये तयार झालेल्या शेततळे अस्तरीकरण तपासणीचे नियोजन करावे.

aharashtra State Horticu

५.६ विभागातील सर्व जिल्हयात व सर्व तालुक्यात तपासणी होईल आणि तयार झालेल्या शेततळ्यांच्या प्रमाणात असेल याची खात्री करण्याची जबाबदारी तपासणी करणा-या विभागाच्या अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.

५.७ अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तपासणीचा अहवाल त्यांच्या अभिप्रायासह कृषि आयुक्तालयास प्रत्येक सहामाहीच्या शेवटी सादर करावा. तथापि तपासणीत गंभीर त्रुटी/उणिवा/अनियमितता आढळून आल्या तर त्याबाबतचा अहवाल तातडीने कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**६ विभागीय कृषि सहसंचालक**

६.१ विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपविभागातील किमान एका सोडतीस स्वतः उपस्थित रहावे.

६.२ विभागीय कृषि सहसंचालक यांनी शेततळे अस्तरीकरणाचे भौतिक लक्षांक व अनुदान वाटप याचे सनियंत्रण करावे.

६.३ अंमलबजावणी सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही होणेबाबत संनियत्रण करावे.

६.४ त्याचप्रमाणे शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी होती किंवा कसे याबाबत संनियत्रण करावे.

६.५ विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक उपविभागातील १ शेततळ्याची रॅंडम पध्दतीने तपासणी करावी.

**७ तांत्रिक व सर्वसाधारण सुचना :-**

७.१ प्लास्टीक फिल्म अस्तरीकरणा करीता लाभार्थ्याने शेततळयाच्या आतील बाजूने योग्य रितीने फिनिशिंग / ड्रेसिंग करावी.

७.२ लाभार्थ्याने शेततळे अस्तरीकरणासाठी अधिकृत ५०० मायक्रॉनची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक राहील.

७.३ **BIS Standard** मधील अधिकृत रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS 15351:2015 Type II या दर्जाची प्लास्टीक फिल्म उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते यांची अद्यावत यादी जिअकृअ व ताकृअ कार्यालयात ठेवावी.

७.४ शेतक-यांना बाजारात उपलब्ध असलेल्या अधिकृत दर्जाच्या प्लास्टीक फिल्म उत्पादकाची निवड करण्याची मुभा राहिल. शेतक-यांनी प्लास्टीक फिल्म ही नमुना तपासणी अहवालाच्या प्रमाणित (Pass) प्रतिसह खरेदी करावी व फिल्मचे बील जीएसटीसह घ्यावे.

७.५ मंजूर आकारमानापेक्षा मोठ्या शेततळ्यास शेतक-याने अस्तरीकरण केल्यास अधिकचा खर्च शेतक-याने स्वतः करावयाचा आहे.

७.६ प्लास्टीक फिल्मचा पुरवठा दर रुपये ७७ प्रति चौ.मी. आणि फिल्म बसवण्यासाठी रु. १८ प्रति चौ.मी. असा एकूण रु. ९५ प्रति चौ.मी. निश्चित करण्यात आलेला आहे.

७.७ फिल्म शेततळयाच्या काठापासुन बंद (अँकरींग) करून संपूर्ण शेततळयात अशा प्रकारे बसवावी की ज्यामुळे फिल्म पाण्याच्या वजनामुळे खाली घसरणार नाही व शेततळयातील साठलेले पाणी जमिनीमध्ये मुरणार नाही.

७.८ शेततळे अस्तरीकरणासाठी पुरवठा केलेल्या फिल्मचे नमूने गुणवत्ता तपासणीसाठी घेणेबाबत स्वतंत्ररित्या सूचना निर्गमित करण्यात येतील.

७.९ पुरवठा करीत असलेल्या फिल्मची गुणवत्ता पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या नमुन्याकरीता लागणारी (१ मीटर X १ मीटर) फिल्म विनामुल्य देणे उत्पादक/पुरवठादार/अधिकृत विक्रेता यांचेवर बंधनकारक राहील.

७.१० शेततळयांचे प्लास्टीक फिल्मची देखभाल/संरक्षण शेतकरी यांचेमार्फत केली जाईल. प्लॅस्टीक फिल्मबाबत गुणवत्ता व दर्जाबाबत हमी देण्याची जबाबदारी उत्पादक/पुरवठादार यांची राहील. गुणवत्ते संदर्भात प्रश्न/वाद निर्माण झाल्यास शेतक-यांनी ग्राहक कायद्यानुसार कार्यवाही करावी.

Maharashtra State Horticulture

७.११ शेततळे अस्तरीकरणाचा लाभ देताना अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व महिलांचे समांतर आरक्षण विचारात घेऊन पुर्वसंमती द्यावी.

७.१२ शेततळ्यातील पाणी वापरण्यासाठी सुक्ष्म सिंचनपध्दतीचा वापर करणे बंधनकारक राहिल.

८ शेततळे अस्तरीकरणाची संपूर्ण माहिती असलेला ३ x २ फुट आकाराचा पक्का बोर्ड शेततळ्याजवळ दिसेल अशा प्रकारे लावून घ्यावा. सदरील खर्च लाभार्थीने स्वतः करावयाचा आहे.

**महाराष्ट्र शासन - कृषि विभाग**

**------------- योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरण**

**सन --------**

लाभार्थीचे नाव : ------------------------------------------------

गाव. ------------ ता ---------------- जि. ------------------

शेततळ्याचे आकारमान x x मी. दिलेले अनुदान रु. ---------------

Maharashtra State Horticult...

## प्रपत्र-अ

## रिइनफोर्सड् एचडीपीइ जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्मसाठी आवश्यक गुणधर्म

## (IS :15351:2015 Type II)

| Sr. No | PROPERTY | REQUIREMENT | |
|---|---|---|---|
| | | Type II | Method of Test |
| 1 | Thickness (mm), Min. | 0.50 mm | IS:7016 Part 1 |
| 2 | Mass (g/m2), Min. | 420 $g/m^2$ | IS:7016 Part 1 |
| 3 | Dimensions ( Length and width) | As declared + 1 percent with no negative tolerance | Annex A of IS 11652 |
| 4 | Carbon black content, percent, Min. | 2.5 ± 0.5 | Annex A of IS 11652 |
| 5 | Breaking load on 20 cm x 10 cm strip, N, Min before U.V exposure | (D1) 6600N<br>(D1) 6600N | IS 13162 (Part 5) |
| 6 | Strain at Maximum Load, percent | 20 ± 5% | IS 13162 (Part 5) |
| 7 | Breaking load on 20cm x 10 cm strip, N, Min After U.V exposure of 1000h | 80% of actual orginal value | IS 13162 (Parts 2 and 5) |
| 8 | Impact failure load, at 1520 mm drop, min gram force at 50 percent failure | 1840gf | Annex B |
| 9 | Tear resistance, N, Min | 250N | IS 7016 (Part 3) |
| 10 | Puncture resistance, N, Min | 500N | Annex D |
| 11 | Bursting strength (Ball burst), (N/cm2), Min | 110 ($N/cm^2$) | IS 7016 (Part 6) |
| 12 | Seam strength before UV exposure (N/mm), Min | 30 (N/mm) | IS 15060 |
| 13 | Seam strength after UV exposure (N/mm), Min | 80% of actual orginal value | Annex B & IS:15060 |
| 14 | Hydrostatic Resistance before UV exposure | No leakage at 15 kg/cm2 | Annex E |
| 15 | Hydrostatic Resistance after UV exposure of 1000hours | 80% of actual original value | Annex E |
| 16 | Ash Content % Max | 1% | Annex F |

**Note :** For hydrostatic resistance test, the test specimen shall be selected such that at least one joint covered, if provided.

# प्रपत्र-ब

## शेततळे अस्तरीकरणासाठी ५० टक्के अर्थसहाय्याकरीता विविध आकारमानानुसार अनुज्ञेय अनुदान तपशील

| MNREGS/RKVY व मागेल त्याला शेततळे अंतर्गत शेततळयाचे प्रकार | एकूण क्षेत्रफळ (घ.मी.) | होणारा पाणी साठा (घ.मी.) | फलोत्पादन पिका खालील किमान क्षेत्र (हे.) | अस्तरीकरणा साठी लागणारी फिल्म (चौ.मी.) | अस्तरीकरणा साठी येणारा खर्च रु. | | | ५० टक्के प्रमाणे जास्तीत जास्त देय अनुदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | फिल्मची किंमत (रु. ७७/- प्रति चौ.मी.) | अस्तरीकरणासाठी खर्च (रु. १८/- प्रति चौ.मी.). | एकूण (रु. ९५/- प्रति चौ.मी.) | |
| १५ X १५ X ३ | ४४१ | २२५ | ०.२० | ५९५.३ | ४५८३६ | १०७१५ | ५६५५१ | २८२७५ |
| २० X १५ X ३ | ६२१ | ३०० | ०.३०/०.२० | ६६५.२ | ५१२२२ | ११९७४ | ६३१९६ | ३१५९८ |
| २० X २० X ३ | ८७६ | ४०० | ०.४० | ८६७.८ | ६६८१७ | १५६२० | ८२४३६ | ४१२१८ |
| २५ X २० X ३ | ११३१ | ५०० | ०.५०/०.४० | १०४६ | ८०५१९ | १८८२३ | ९९३४२ | ४९६७१ |
| २५ X २५ X ३ | १४६१ | ६२५ | ०.६० | १२३६ | ९५१५५ | २२२४४ | ११७३९९ | ५८७०० |
| ३० X २५ X ३ | १७९१ | ७५० | ०.७०/०.६० | १४२६ | १०९७९१ | २५६६५ | १३५४५७ | ६७७२८ |
| ३० X ३० X ३ | २१९६ | ९०० | ०.८० | १६४३ | १२६५४५ | २९५८२ | १५६१२७ | ७५००० |

Maharashtra State Horticulture

## प्रपत्र-१

**------------------- योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी अर्थसहाय्य मिळणेबाबत करावयाचा अर्ज**

ठिकाण-
दिनांक-

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी,**
**---------------------**

**विषय :- -------------- योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी ५० टक्के अर्थसहाय्य मिळणेबाबत अर्ज...**

महोदय,

मी, श्री/श्रीमती-----------------------------------------------------, गाव-------------ता.------------------ चा रहिवाशी शेतकरी असून माझ्याकडे एकूण---------- हे. क्षेत्र आहे. या क्षेत्रावर मी ......................... x .......... x मी या आकारमानाचे शेततळे घेतले असुन याचा लाभ फक्त फलोत्पादन क्षेत्राशी निगडीत पिकांकरीताच घेण्यात येत आहे. मी सदर शेततळयास -------------------------- योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी इच्छूक असुन अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के (विहीत मर्यादेच्या अधिन राहुन) अर्थसहाय्य मिळणेसाठी अर्ज सादर करीत आहे.

सोबत जमिनीचे ७/१२ उतारे जोडले आहेत. माझेकडे खालीलप्रमाणे भाजीपाला/फळे-फुले/औषधी वनस्पती निहाय लागवड केलेले क्षेत्र आहे. त्याचप्रमाणे भविष्यकाळात सदर शेततळ्यातील पाण्याचा उपयोग मी फलोत्पादन पिकाच्या लागवडीसाठी करिल.

| अ.क्र. | पिकाचे नाव | लागवडीचे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| **एकूण** | | |

**सोबत** —

१. अर्ज.
२. ७/१२ चा उतारा (फलोत्पादनाच्या नोंदीसह).
३. आधार कार्डची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावतीची झेरॉक्स).
४. आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स (फोटोसह).
५. हमीपत्र.
६. लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास प्राधिकृत अधिका-याचे प्रमाणपत्र/संवर्ग दाखला.

उपरोक्तसाठी असलेल्या अंमलबजावणी सुचना मला बंधनकारक राहतील. तरी कृपया मला शेततळे अस्तरीकरणाचा लाभ द्यावा, ही विनंती.

**दिनांक -** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**नाव -**

**ठिकाण-**

## प्रपत्र २

## शेततळे अस्तरीकरण या घटकासाठी द्यावयाचे पूर्वसंमतीपत्र

**जा.क्र. ------------------------------**

**ताकृअ, ------------- दि.   /   /**

**प्रति,**

**श्री./श्रीमती ----------------------------------------**

**मु.पो. ------------तालुका. -------- जिल्हा. ---------**

आपल्या अर्जाप्रमाणे शेततळे अस्तरीकरणासाठी पुर्वसंमती खालील अटींवर देण्यात येत आहे.

१. पुर्वसंमती प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत काम सुरु करणे आवश्यक आहे. अन्यथा ही पूर्वसंमती रद्द समजण्यात येईल. त्याचप्रमाणे पुर्वसंमती दिलेल्या तारखेपासून २ महिन्याच्या आत अस्तरीकरणाचे काम पुर्ण करणे बंधनकारक राहील.

२. शेततळे अस्तरीकरणासाठी BIS Standard मधील ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS 15351:2015 Type II या दर्जाची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे अस्तरीकरणासाठी उपलब्ध प्लास्टीक फिल्म IS 15351:2015 Type II उत्पादकाची निवड करण्याची आपणास मुभा आहे. अनुदान पात्रतेसाठी वरिल दर्जा असलेले प्लास्टीक फिल्मच्या खरेदीचे बील व अस्तरीकरण बसविण्याचे बील जीएसटीसह सादर करणे आवश्यक आहे.

३. अस्तरीकरण बाबींसाठी मराफऔवमं मंडळाने निश्चित केलेल्या मापदंडानुसार अर्थसहाय्य देय राहिल.

४. अस्तरीकरणाचे काम पुर्ण झाल्यावर हमीपत्रात नमूद केलेल्या क्षेत्रामध्ये फलोत्पादन पिकांची लागवड व सुक्ष्म सिंचन वापर करणे बंधनकारक राहील.

**तालुका कृषि अधिकारी.**

## प्रपत्र - ३

**------------------------ योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी अर्थसहाय्य मिळणेबाबतच्या अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्र**

मी अर्जदार श्री/श्रीमती ------------------------------------------------------------, गाव ----------------------- ता. -----------------येथील रहिवाशी शेतकरी असून माझेकडे ८-अ नुसार एकूण ------- हे. क्षेत्र आहे. यापैकी खालील तपशीलापनुसार एकूण -------- क्षेत्रावर फलोत्पादन पिकांची लागवड असून त्याबाबतचे नोंद असलेचे ७/१२ खाते उतारे सोबत सादर करण्यात आले आहे. सदर क्षेत्रासाठी मी ------------------------ योजनेंतर्गत x x मी या आकारमानाचे शेततळे घेतले असुन याचा लाभ भाजीपाला, फळे-फुले व औषधी वनस्पती क्षेत्राशी निगडीत पिकांकरीताच घेण्यात येत आहे. मी सदर शेततळयास --------------------- योजनेंतर्गत प्लास्टिक फिल्म अस्तरीकरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या अंमलबजावणी सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

१. शेततळे लाभ क्षेत्राच्या जमीनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सोबत जमिनीचे ७/१२ उतारे जोडत आहोत. माझे सर्व मिळुन खालीलप्रमाणे फलोत्पादन पिकांची लागवड केलेली आहे.

| अ.क्र. | पिकाचे नाव | गट/सर्व्हे नंबर | फलोत्पादन लागवडीचे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| एकूण | | | |

२. मी उपरोक्तनुसार माझे नावे असलेल्या गट नंबर -------- सर्व्हे नं. ------- मध्ये शेततळे तयार केलेले आहे.

३. शेततळे अस्तरीकरणासाठी BIS Standard मधील ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS 15351:2015 Type II या दर्जाची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

४. या शेततळयामध्ये साठलेल्या पाण्यामधून फलोत्पादन क्षेत्राशी निगडीत ------- हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. पाण्याच्या उपलब्धतेनूसार सध्या फलोत्पादन पीक घेत असून यासाठी पाण्याचा उपयोग होत आहे. यापुढे मी त्या पिकांसाठी सूक्ष्म सिंचनाचा उपयोग करील.

५. मी वरील शेततळ्यामध्ये साठवण क्षमतेचा विचार करुन नदी, कालव्यातून उपसा सिंचन करुन पाणी साठवणार आहेत.

६. सदरचे शेततळे अस्तरीकरणासाठीच्या सर्व तांत्रिक बाबीची माहिती घेतलेली आहे व ती मला मान्य आहे.

७. मार्गदर्शक सुचनांनुसार अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर मी कृषि सहाय्यक व मंडळ कृषि अधिकारी यांना कळविणे माझ्यावर बंधनकारक राहील.

८. अस्तरीकरणाचे काम पुर्ण झाल्यावर व त्याची मंडळ कृषि अधिकारीमार्फत, तपासणी झाल्यानंतर झालेल्या कामाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के (विहीत मर्यादेच्या अधिन राहुन) अनुदान मिळणार आहे व यापेक्षा जादाचा होणारा खर्च मी स्वतः करण्यास बांधिल राहील, याची मला जाणिव आहे.

९. अस्तरीकरण केलेल्या तलावाचे संरक्षण, देखभाल, दुरुस्ती करण्याची पूर्ण जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.

Maharashtra State Horticulture ...

१०. सदर तलावात पाणी साठवणे व साठवलेले पाणी शेतात पोहचविण्यासाठी लागणारा खर्च, मला स्वतःला करावयाचा आहे, यास कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळणार नाही; त्याच प्रमाणे शेततळ्याच्या देखभालीसाठी येणारा आवर्ती खर्च व संपूर्ण देखभाल मला करावी लागेल याची देखील मला जाणीव आहे.

११. सदर शेततळे अस्तरीकरणासाठी इतर कोणत्याही शासकीय योजने अंतर्गत यापूर्वी अनुदान घेतले नाही अथवा यापुढे घेण्यात येणार नाही, याची मी हमी देतो.

१२. शेततळे अस्तरीकरणाचे काम विहीत मुदतीत व या आर्थिक वर्षात पूर्ण करणेची जबाबदारी माझी असून अस्तरीकरण अर्धवट अवस्थेत राहिल्यास अनुदानास पात्र नसेल, याची मला जाणीव आहे.

१३. प्लास्टीक अस्तरीकरण केल्यानंतर मी स्वतः स्वखर्चाने कुंपण घालणे आवश्यक आहे, याची मला जाणीव आहे.

१४. शेततळयामध्ये वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी इनलेट, जादाचे पाणी वाहून जाण्यासाठी आऊटलेट करण्यात येतात. तथापि, अशा शेततळयांमध्ये प्लास्टिक फिल्म अस्तरीकरणासाठी मंजुरी दिल्यास इनलेट व आऊटलेट स्वखर्चाने बंद करणे बंधनकारक राहील. याची मला जाणीव आहे.

१५. सदर शेततळयाच्या ठिकाणी/ बांधावर **"--------------------- योजनेंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी अर्थसहाय्य"** असे ठळक अक्षरात नमूद करुन लोगोसह बोर्ड लावेल.

सदर हमीपत्र मी जाणीवपुर्वक व कोणत्याही दबावाखाली न येता पूर्ण विचारांती करत आहे.

**लाभार्थ्याची सही**

**नाव-**

Maharashtra State Horticultu

## प्रपत्र -४

## वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण मोका तपासणी

**(मंडळ कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक यांनी करणे)**

| | |
|---|---|
| १ | तपासणी दिनांक - |
| २ | तपासणी पथक प्रमुख :- श्री. ..........................................मंकृअ................................<br>सदस्य - श्री. ..........................................  कृषि पर्यवेक्षक .................................... |
| ३ | लाभार्थ्याचे नाव - श्री. ..........................................................................................<br>गावः- .......................... ता. .............................. जि...............................<br>सर्वे नं. ..............................  वर्गवारी<br>(अ.जा./अ.ज./महिला/सर्वसाधारण)........................... |
| ४ | बाब- वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण<br>अ. योजना .......................................................वर्ष :- |
| ५ | मोका तपासणी तपशील<br>• शेततळ्याची लांबी .................. मी. रुंदी............... मी. उंची .................. मी. क्षेत्रफळ .............. चौ. मी.<br>• प्लॉस्टिक अस्तरीकरणाचे एकूण क्षेत्रफळ ...................... चौ.मी. |
| ६ | **शेततळे अस्तरीकरणासाठी वापरण्यात आलेल्या प्लॅस्टीक फिल्मची तपासणी**<br>**BIS** नोंदणीकृत सेवा पुरवठादाराचे नाव - ..........................................................................<br>पत्ता- ......................................... दुरध्वनी क्र.................... भ्रमणध्वनी क्र. ............................ |
| ६.१ | शेततळ्यासाठी **BIS Standard** ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS 15351:2015 Type II या दर्जाची आहे किंवा नाही? **होय/नाही** |
| ६.२ | रिइनफोर्सड् एचडीपीइ जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्मसाठी आवश्यक गुणधर्म (IS:15351:2015 Type II) प्रपत्र - ......... प्रमाणे पास कॉपी बिलासोबत आहे किंवा नाही? **होय/नाही**<br>• **(सदरची बाब शेतक-याने उत्पादकाकडून प्लास्टिक फिल्म सोबत प्राप्त केलेल्या नमुना तपासणी अहवालाच्या प्रमाणित प्रती वरून तपासावी.)** |
| | फिल्म शेततळयाच्या काठापासुन बंद (अँकरींग) करून संपूर्ण शेततळयात अशा प्रकारे बसवलेली आहे किंवा नाही की ज्यामुळे फिल्म पाण्याच्या वजनामुळे खाली घसरणार नाही व शेततळयातील साठलेले पाणी जमिनीमध्ये मुरणार नाही. **होय/नाही** |
| ६.४ | तारेच्या जाळीचे कुंपण शेततळयाच्या बाहेरील बाजूस केलेले आहे किंवा नाही? **होय/नाही** |
| ६.५ | शेततळयांमध्ये पाणी भरलेले आहे किंवा नाही? **होय/नाही** |
| ६.६ | शेततळ्याच्या बाजूने गवत लागवड केली आहे / नाही. **होय/नाही** |
| ६.७ | वैयक्तिक शेततळेची अस्तरीकरण योजनेची माहिती असलेला बोर्ड लावलेला आहे / नाही. **होय/नाही** |
| ७ | **मंजूर मॉडेल नुसार वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी झालेल्या खर्चाचा तपशील** |

| अ. क्र. | बाब | परिमाण | मार्गदर्शकसुचनेनुसार खर्चाचे मापदंड | प्रत्यक्ष खर्च | मार्गदर्शकसुचनेनुसार, मंजूर आकारमानानुसार देय अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | अस्तरीकरणासाठी प्लास्टिक फिल्म | ...........चौ.मी. | रु. ७७/चौ.मी. | | |
| २ | फिल्म लावण्याचा खर्च | ...........चौ.मी. | रु. १८/चौ.मी. | | |
| | **एकुण** | ...........चौ.मी. | | | |

Maharashtra State

| | |
|---|---|
| ८ | **शेततळे अस्तरीकरणाद्वारे साठविलेल्या पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी संरक्षित सिंचनाची सोय शेतक-याने केली आहे अथवा नाही ?** **होय/नाही** |
| ९ | शेततळयाच्या पाण्यावर भिजणारी पिके / शेततळयामुळे पिकनिहाय संरक्षित सिंचनाखाली आलेले क्षेत्र |

| अ.क्र. | पिके | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

| | |
|---|---|
| १० | कामाची नोंद घेतलेली मापनपुस्तिका<br>गावाचे नाव ............................. तालुका........................ मापनपुस्तिका क्र. ------------- पृष्ठ क्र ------------- |
| ११ | वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणाच्या अनुदान मागणी वेळी घेतलेली फोटोप्रत या अनुदान मागणी सोबत जोडावा **होय/नाही** |
| १२ | सदर अस्तरीकरण केलेल्या वैयक्तिक शेततळ्याचे **Geo Tagging** केले असता अक्षांश, रेखांशासह निरीक्षणे खालीलप्रमाणे<br>अक्षांश ..........° दक्षिण ते .........° उत्तर<br>रेखांश .......... ° पुर्व ते ............ ° पश्चिम |
| १३ | अंतिम देय रक्कम रू.-------------- |

दि. - / /

स्थळ -

समक्ष-

स्वाक्षरी

पथक प्रमुख, श्री....................... मंकृअ............

स्वाक्षरी

लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

सदस्य- श्री. ...........................कृप............

Maharashtra State Horticult

## प्रपत्र - ५

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील तंत्र अधिकारी यांनी अस्तरीकरण घटकाच्या अनुदानासाठी लाभार्थीचा प्रस्ताव तपासण्याकरिताची यादी (चेकलिस्ट).

| | | |
|---|---|---|
| १ | शेतक-याचा अर्ज. | (आहे / नाही.) |
| २ | ७/१२ चा उतारा (फलोत्पादनाच्या नोंदीसह). | (आहे / नाही.) |
| ३ | आधार कार्डाची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावती झेरॉक्स). | (आहे / नाही.) |
| ४ | आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स (फोटोसह). | (आहे / नाही.) |
| ५ | हमीपत्र. | (आहे / नाही.) |
| ६ | शेतकरी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास वैध अधिका-याचे प्रमाणपत्र / संवर्ग दाखला. | (आहे / नाही.) |
| ७ | स्थळ दर्शक नकाशा | (आहे / नाही.) |
| ८ | चतु:सिमा | (आहे / नाही.) |
| ९ | पुर्वसंमती पत्र | (आहे / नाही.) |
| १० | मोका तपासणी अहवाल. | (आहे / नाही.) |
| ११ | जीएसटीसह बील इनव्हाईस. | (आहे / नाही.) |
| १२ | उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अनुदान शिफारसपत्र. | (आहे / नाही.) |

Maharashtra State Horticulture